सासरे

माझे सासरे आता नाहीत पण मला अजूनही हे पटत नाही. ते अमरच आहेत असे सारखे वाटते. इतके विद्वान्, इतके समंजस, न रागावणारे. ह्यानां मृत्यू कसा काय नेईल? शक्य नाही, असे वाटे. मी बंगाली म्हणून माझ्याशी बंगाली बोलतो म्हणत इंग्लिश मध्येच बोलायचे. त्याना खूप वाटे बंगला बोलावेसे, पण उच्चार उमटत नसे. त्यामुळे इंग्लिशच बोलायची भाषा झाली होती. डबल एमए पीएचडी (फिलॉसफी संस्कृत) असल्यामुळे इंग्लिशची अडचण नव्हतीच आणि मी तर एसएससी बोर्डात 3 लाख विद्यार्थ्यांत पहिली आलेली. शिवाय एमए आणि आयएएस. माझे इंग्रजी उत्तमच होते. त्यांचे मला मार्गदर्शन सर्वच विषयांत होई. पैशाच्या बाबतीत तर नेहमीच. मुलांच्या शिक्षणांत नातवाला स्वतः घरी ठेवून होस्टेलला नाही ठेवायच अस सांगून त्याला बीई केले. दुस-या नातवाला (मुलीचा मुलगा) त्याला पण घरी ठेवून बीई केले. मला वाटत ते जाताना समाधानाने गेले. फक्त माझी मुलगी सृष्टी - तिच शिक्षण राहिले असे त्याना वाटले. अर्थात् ती सीबीएसई ची 10 वी पास त्यांच्या देखत झाली. मुलाने व सुनेने (नातीसह) आपल्याकडे रहावे असे त्यांना वाटे. पण ते आमच्या नोकरीमुळे शक्य नव्हते. म्हणून ते मात्र आमच्याकडे भुवनेश्वरला येणार होते. माझा मुलगा बीई नंतर पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. आबू आणि मॉमला आपल्याकडेच घेऊन ये असे मला सांगून गेला. पण प्राक्तन. नशीबाची भाषा कुणाला कळलेली नाहीच. मला एक महाभारतांतील कहाणी आठवली. धर्मराजाकडे एक याचक आला. आता तू उद्या ये असे सांगून धर्मराजा महालांत जाण्यास वळले तेव्हा भीम तिथेच होता. तो म्हणाला हे यमपुत्र ना ह्यांना यमराजाने सांगितलेले दिसले की हा याचक उद्यापर्यंत जिवंत राहील.

तू उद्या ये असे सांगून धर्मराजा महालांत जाण्यास वळले तेव्हा भीम तिथेच होता. तो म्हणाला हे यमपुत्र ना, हयांना यमराजाने सांगितलेले दिसले की हा उद्या पर्यंत जिवंत राहील. मग धर्मराजाला आपली चूक कळून त्याने याचकाचे काम लगेच करून टाकले.

आबू देखील लौकर भुवनेश्वरला येऊन राहिले असते तर त्यांना मुलाचा सहवास मिळाला असता.

---------------------------------------------------------------------------